सकाळ
अमरावती, नागपूर, गुरुवार, दि. १ जून २०२३

# देशातील आमदारांचे राष्ट्रीय विधायक संमेलन

## १५ व १६ जूनला मुंबई येथे आयोजन

**अमरावती, ता. ३१ :** देशातील सर्व राज्य व केंद्रशासीत प्रदेशांमधील आमदारांचे राष्ट्रीय विधायक संमेलन १५ ते १६ जून यादरम्यान आयोजित करण्यात आले आहे. पुणे येथील एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटतर्फे या संमेलनाचे आयोजन करण्यात आले असून ते मुंबईतील बीकेसी जीओ सेंटर येथे होत आहे. नेतृत्व लोकशाही, प्रशासन आणि शांतताप्रिय समाज निर्माण करण्याचा उद्देश, या संमेलनामागे असल्याची माहिती एमआयटी सरपंच संसदेचे प्रमुख समन्वयक योगेश पाटील यांनी पत्रकार परिषदेतून दिली.

राष्ट्रनिर्माण, राष्ट्रीय एकात्मिकता व राष्ट्रीय सर्वांगीण शाश्वत विकास, या त्रिसूत्रीचा प्रमुख उद्देश ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनाचे उद्घाटन १६ जूनला होणार असून १७ जूनला समारोप होणार असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. माजी लोकसभा सभापती सुमित्रा महाजन, डॉ. मीरा कुमार, शिवराज पाटील चाकूरकर, मनोहर जोशी व विद्यमान सभापती ओम बिर्ला या संमेलनाचे मार्गदर्शक व संयोजक आहेत. एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्मेंटचे संस्थापक अध्यक्ष राहुल कराड हे या संमेलनाचे प्रमुख संयोजक आहेत. देशभरातील सर्व आमदारांना निमंत्रण देण्यात आले असून २०८८ आमदारांनी नोंदणी केली असल्याची माहिती देण्यात आली. पत्रकार परिषदेस माजी महापौर चेतन गावंडे, अभय खेडकर, प्रकाश महाले, गजानन मिरगे, वाशीमचे प्रफुल्ल बानगावकर, कपिल देवके व नितीन राजवैद्य उपस्थित होते.